# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत विस्तारसेवा अंतर्गत दिनांक : २३/०३/२०२३ रोजी श्री देवाजी तोफा, मेंढा-लेखा, गडचिरोली यांचे व्याख्यान **'गावातील सर्वसमावेशक निर्णयप्रक्रियेची फलश्रुती'** या विषयावर आयोजित करण्यात आलेले होते.

या व्याख्यानासाठी विद्यापीठातील आणि गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ असे एकूण ६३ व्यक्ती उपस्थित होत्या. सुरवातीला श्री प्रेमनाथ सोनवणे ह्यांनी सर्वांचे स्वागत केले.प्रा. संजीवनी महाले ह्यांनी श्री देवाजी तोफा यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रा. जयदीप निकम आणि प्रा. कविता साळुंके ह्यांनी आपले ग्रामीण भागाशी संबंधित पूर्वानुभव सांगितले. व्यासपीठावर जेष्ठ गांधीवादी श्रीमती नलिनी नार्वेकर ह्यांनीही ग्रामीण विकासाबाबत माहिती दिली.

अनुसूचित जमातीत जन्मलेल्या श्री. देवाजी तोफा यांचे शिक्षण फक्त इयत्ता तिसरी पर्यंत झालेले असूनही त्यांनी आदिवासी क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे. त्यांच्या गावाचे घोषवाक्य "दिल्ली, मुंबई आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार" असे आहे. त्यानुसार ग्रामविकासाच्या विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी त्यांनी आपल्या गावात केलेली आहे. गावाच्या PAN कार्ड, सन 2006 च्या वनहक्क कायद्यांतर्गत सामुहिक वनहक्क कायद्याची अंमलबजावणी असे विविध उपक्रम त्यांच्या गावात राबविले आहेत. त्यांच्या गावाचे सगळे निर्णय ग्रामसभेत सर्वसहमतीने घेतले जातात. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते या गावाला भेट देवून त्यांच्या गावाच्या विकासाची कार्यपद्धती समजून घेत असतात.

गडचिरोली जिल्हातील मेंढालेखा या आदिवासी गावात ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच पदाची जबाबदारी घेऊन 'जंगल बचाव मानव बचाव' ह्या पासून कार्य करून गावातील व्यक्तींचा अभ्यास गट तयार केला. त्यातूनच ग्रामसभा सक्षमीकरण, सर्वानुमते निर्णय प्रक्रिया, स्त्री पुरुष समानता जनजागृती, ग्रामदान ग्रामवन विकसित केले. संपूर्ण भारतात २००२ साली सर्वप्रथम जैवविविधता नोंद दस्तऐवज कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. भारतात सर्वप्रथम २००६ साली वनहक्क कायद्या अंतर्गत सामुहिक वनहक्क कायद्याची अंमलबजावणी. गावाचे पन कार्ड सर्वात प्रथम काढण्यात आले.

आदिवासी व्यक्तींनी ग्रामसभेत  सर्वानुमते निर्णय प्रक्रिया कशी करावी, जैवविविधतेचे संरक्षण कसे करावे, जंगल कसे राखावे, जंगलातून मिळणाऱ्या संपत्तीचे विक्री नियोजन बाबतही मार्गदर्शन केले.आदिवासी समाजाला मार्गदर्शनाची गरज असल्यास ते प्रत्यक्ष गावांना भेट देऊन मार्गदशन करतात.

शेवटी डॉ. प्रमोद पवार ह्यांनी सर्वांचे आभार मानून व्याख्यान संपल्याचे जाहीर केले.


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
Yashwantrao
van Maharashtra Open University


यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
Yashwantrao Chavan Maharashtra Open University